# ❤️😊क्रुर चेष्टा! सोलापुरात रात्री बॅटरीच्या उजेडात पाहणी, अहिल्यानगर जिल्ह्यातही नुकसानीचा आढावा

**सोलापूर/अहिल्यानगर । प्रतिनिधी ✍️**

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे शेतजमीन, शेतपीक, घरे, रस्ते, पूल, वीज व पाणीपुरवठा योजना, पशुधन तसेच विविध पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचे पाहणी पथक दौऱ्यावर आले आहे. मात्र, या पथकाने (०४ नोव्हेंबर) रात्रीच्या अंधारात आणि बॅटरीच्या उजेडात पाहणी दौरा करून एकप्रकारे शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा केल्याचे पाहायला मिळाले. 😊☹️☝️↔️

सोलापूर जिल्ह्यातील पाहणीः केंद्रीय ग्राम विकास विभागाचे अवर सचिव अभिषेक कुमार, ऊर्जा विभागाचे उपसंचालक करन सरीन, वित्त विभागाचे उपसचिव कंदर्फ पटेल आणि जलशक्ती विभागाचे संचालक सत्येंद्र प्रताप सिंग हे चार सदस्यीय केंद्रीय पथक नुकसानीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर आहे. या पथकाचा मंगळवारी सोलापूरच्या मोहोळ तालुक्यातील कोळेगावात पाहणी दौरा नियोजित होता. परंतु, केंद्रीय पथक पुण्याहून उशिराने निघाल्याने ते रात्रीच्या अंधारात कोळेगावात पोहोचले. यानंतर पथकातील अधिकाऱ्यांनी बॅटरीच्या उजेडातच पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. त्यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुराची माहिती तसेच नुकसानीची सविस्तर माहिती घेतली. पथकासोबत आलेल्या कर्मचाऱ्यांनी बॅटरीच्या उजेडात लांबवर प्रकाशझोत टाकून अधिकाऱ्यांना झालेले नुकसान दाखवण्याचा प्रयत्न केला.

सर्व काही रात्रीच्या अंधारात सुरू होते. केंद्रीय पथकाला सकाळची वाट पाहणेही महत्त्वाचे वाटले नाही. केंद्रीय पथकाने एकप्रकारे शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा केल्याचा सूर उमटत आहे. ⛹️⛹️⛹️

अहिल्यानगर जिल्ह्यातील आढावाः अहिल्यानगरमध्ये केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या केंद्रीय पथकाने जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून नुकसानीचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत भारत सरकारचे संयुक्त सचिव व केंद्रीय पथकाचे प्रमुख आर. के. पांडे उपस्थित होते. त्यांच्यासोबत कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संचालक डॉ. अरविंद वाघमारे, गृह मंत्रालयाचे आशिष गौर, इस्रोच्या एस. एफ. एनआरएससी संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. एस.व्ही.एस.पी. शर्मा, तसेच रस्ता परिवहन व महामार्ग मंत्रालयाचे कार्यकारी अभियंता विशाल पांडे हेही उपस्थित होते.

बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव, महावितरणचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, अधीक्षक अभियंता श्री. पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे आदी उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा सविस्तर अहवाल पॉवर पॉइंटच्या माध्यमातून सादर केला. त्यांनी शेतजमीन व शेतपिकांचे नुकसान, मनुष्यहानी, पशुधन हानी, घरांचे व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, मदत वितरण, पुनर्वसन कार्य आणि पायाभूत सुविधांच्या पुनर्बांधणीबाबतची माहिती केंद्रीय पथकाला दिली.

केंद्रीय पथक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजेपासून जिल्ह्यातील विविध नुकसानग्रस्त भागांना भेट देऊन झालेल्या नुकसानीचा प्रत्यक्ष आढावा घेणार आहे.◀️